शनिवार, दि. २१ जून २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३१६ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# इंग्रजी शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात!

## इंग्रजी शाळांमधील शिक्षकांच्या पात्रतेवर आमदार बबनराव लोणीकर यांचा आक्षेप; चौकशीची मागणी

**परतूर । प्रतिनिधी -** महाराष्ट्राचे माजी मंत्री आणि परतूर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांनी इंग्रजी शाळांमधील शिक्षकांच्या पात्रतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी इंग्रजी शाळांमधील शिक्षणाचा खालावलेला दर्जा आणि अपात्र शिक्षकांच्या नियुक्त्यांवर तीव्र टीका केली. शिक्षणाच्या नावाखाली चालणारी लूट आणि अपात्र शिक्षकांचा भरणा यामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आहे, असे त्यांनी ठणकावले.

**शिक्षकांच्या पात्रतेचा अभाव** लोणीकर यांनी सांगितले की, अनेक इंग्रजी शाळांमध्ये शिक्षक म्हणून नेमल्या जाणाऱ्या व्यक्तींकडे आवश्यक शैक्षणिक पात्रता आणि प्रशिक्षणाचा अभाव आहे. आठवी, दहावी किंवा बारावी पास झालेल्या व्यक्तींना, विशेषतः शाळा संस्थाचालकांच्या नातेवाईकांना, शिक्षक म्हणून नियुक्त केले जाते. यामध्ये संस्थाचालकांच्या पत्नी, बहिणी, भाऊजाई किंवा इतर जवळच्या नातेवाईकांचा समावेश आहे, ज्यांच्याकडे शिक्षण क्षेत्रातील कोणतीही औपचारिक पात्रता नसते. शिक्षक हा विद्यार्थ्यांचा पाया घडवणारा दुवा आहे. जर शिक्षकच अपात्र असतील, तर मुलांना दर्जेदार शिक्षण कसे मिळणार? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

**पात्रतेच्या अभावाचे परिणाम शिक्षणाचा खालावलेला दर्जा:** अपात्र शिक्षकांमुळे विद्यार्थ्यांना मूलभूत कौशल्ये, जसे की मराठी आणि इंग्रजी वाचन, लेखन आणि गणित, नीट शिकवली जात नाहीत. लोणीकर यांनी धक्कादायक खुलासा केला की, पाचवीच्या ७०% विद्यार्थ्यांना मराठी नीट वाचता येत नाही, तर इंग्रजी तर पूर्णपणे अवघड आहे.

**पालकांचा विश्वासघात:** पालक मोठ्या रकमेची फी आणि डोनेशन देतात, पण अपात्र शिक्षकांमुळे मुलांचे शैक्षणिक नुकसान होते. यामुळे पालकांना ट्यूशन किंवा खासगी कोचिंगचा आधार घ्यावा लागतो, ज्यामुळे त्यांच्यावरील आर्थिक भार वाढतो.

**शिक्षणाच्या उद्देशाला हरताळ:** शिक्षणाचा उद्देश हा विद्यार्थ्यांना ज्ञान आणि कौशल्ये देऊन सक्षम बनवणे आहे. मात्र, अपात्र शिक्षकांमुळे हा उद्देशच हरवतो, आणि शाळा केवळ व्यावसायिक धंदा बनतात.

**संस्थाचालकांचे नातेवाईकांचा भरणा** लोणीकर यांनी विशेष जोर देऊन नमूद केले की, अनेक इंग्रजी शाळांमध्ये शिक्षकांच्या जागा भरण्यासाठी पात्रता आणि अनुभवापेक्षा नातेसंबंधांना प्राधान्य दिले जाते. संस्थाचालक आपल्या नातेवाईकांना नोकरी देण्याच्या नादात विद्यार्थ्यांचे भविष्य पणाला लावत आहेत, असे ते म्हणाले. यामुळे शाळांमधील शिक्षणाची गुणवत्ता गंभीरपणे प्रभावित होत आहे. अशा शिक्षकांना विषय शिकवण्याचे कौशल्य नसते, आणि ते विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यातही अपयशी ठरतात.

**कायद्याचे उल्लंघन** शिक्षकांच्या नियुक्तीसाठी महाराष्ट्रात आणि केंद्र सरकारच्या शिक्षण धोरणांनुसार विशिष्ट पात्रता निकष (जसे की इ.एव., ऊएव. किंवा इतर संबंधित पदव्या) अनिवार्य आहेत. मात्र, अनेक इंग्रजी शाळा या नियमांचे उल्लंघन करतात. लोणीकर यांनी प्रश्न उपस्थित केला की, शिक्षण विभाग आणि स्थानिक प्रशासन अशा शाळांवर कारवाई का करत नाही? अपात्र शिक्षकांच्या नियुक्त्या हा कायद्याचा भंग आहे आणि याची चौकशी व्हायला हवी.

**आमदारांचे आवाहन आणि कृती** लोणीकर यांनी सरकार आणि शिक्षण विभागाला या गंभीर समस्येकडे लक्ष देण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी मागणी केली की:



**शिक्षकांच्या पात्रतेची तपासणी** सर्व इंग्रजी शाळांमधील शिक्षकांच्या शैक्षणिक पात्रतेची आणि प्रशिक्षणाची कठोर तपासणी करावी.

**कायदेशीर कारवाई:** अपात्र शिक्षकांना नियुक्त करणाऱ्या शाळांवर कठोर कारवाई करावी, ज्यामध्ये दंड, परवाना रद्द करणे किंवा इतर कायदेशीर उपायांचा समावेश असेल.

**पालकांना जागरूकता:** पालकांनी शाळांच्या कारभारावर लक्ष ठेवावे आणि अपात्र शिक्षकांविरुद्ध तक्रार नोंदवावी.

**शिक्षण धोरणाची अंमलबजावणी:** शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी सरकारने कठोर धोरणे लागू करावीत आणि शाळांना जबाबदार धरावे.

**विद्यार्थ्यांचे भविष्य वाचवण्याची गरज** शिक्षण हे समाजाचा कणा आहे. पण अपात्र शिक्षक आणि व्यावसायिक दृष्टिकोनामुळे हा कणा कमकुवत होत आहे, असे लोणीकर यांनी सांगितले. त्यांनी शाळा व्यवस्थापनांना चेतावणी दिली की, शिक्षणाचा बाजार करणे बंद करावे आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याला प्राधान्य द्यावे. तसेच, त्यांनी पालकांना एकत्र येऊन शाळांच्या मनमानीविरुद्ध आवाज उठवण्याचे आणि आपल्या मुलांच्या शिक्षणाच्या हक्कासाठी लढण्याचे आवाहन केले.

**पुढील पावले** लोणीकर यांनी या मुद्द्याला विधानसभेत मांडण्याची आणि राज्यस्तरावर चर्चा घडवून आणण्याची तयारी दर्शवली आहे. मी हा प्रश्न जोरकसपणे मांडणार आहे. अपात्र शिक्षक आणि शाळांच्या लुटीच्या धंद्याला आळा घालण्यासाठी कठोर कायदे आणि कारवाईची गरज आहे, असे त्यांनी ठणकावले. तसेच, शिक्षण विभागाने प्रत्येक शाळेची नियमित तपासणी करावी आणि पालकांना पारदर्शक माहिती उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

युवा आदर्श

### योगासनं ...

शास्त्रशुद्ध पध्दतीनं
करायची योगासनं
उरकायचे काम एक
नसावे असे प्रहसन
जागा नसावी मलीन
आसनी व्हा तल्लीन
पुजा पाठ यज्ञ कर्म
एक रूप व्हावे लीन
वेळ हवी ठरवलेली
ठेवायचे चित्त प्रसन्न
घ्यावे शांत समजून
चौरस खायचे अन्न
नियम घ्यावे समजून
करावे आधी चिंतन
तन मन स्वस्थ होता
बदलून जाई प्रांक्तन
तजेलदार बनेलं तन
निरामय होईल मन
स्वत: घ्यारे अनुभूती
सिध्द विद्या पुरातन
भारतीय देन प्राचीन
जगता करिते सधन
बदलावी जीवनशैली
लाभे अमोघ साधन
अचूक पध्दती करावे
सत्वपरीक्षा योगासन
सुखी जीवन महामंत्र
समृद्ध प्राप्त सिंहासन

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## व्वा प्रशासन... वाह रे जालना ...



जालना शहरातील हे चित्र सिंधी बाजार ते मामा चौक या मोठ्या बाजारपेठेतील आहे. या मार्गावर नेहेमीच वर्दळ असते. ॲटो रिक्षा चालकांचा मनमानी थांबा, हातगाड्या, दुकानांपुढे आलेली दुकाने, आणि जनावरे जसे की एखादी गोशाळाच या भागात आहे की काय असा प्रश्न उपस्थित व्हावा. या सर्व कारणांमुळे वाहतुकीसाठी रस्ताच दिसून येत नाही. वाहनधारकांना याचा नाहक त्रास नेहेमीच सहन करावा लागत आहे. या बाबीकडे जालना शहर महानगर पालिका ही डोळे झाकून आहे. अन् वाहतुक शाखा सोशल वार्डनवर अवलंबून आहे. आता जिल्हा प्रशासनानेच याकडे लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे.

## जालन्यात 'गुरू पाठीराखा' दिंडी माहितीपटाचे प्रदर्शन

**जालना । प्रतिनिधी -** आषाढी वारी निमित्त वारकरी धर्म संकीर्तन सेवा प्रतिष्ठान कुंभारझरी ता.जाफराबाद येथून स्वग्राम ते पंढरपूर येथे जाणारी पायी दिंडी शनिवारी जालना मुक्कामी येत आहे. दिंडीच्या स्वागतासाठी मराठी भाषा व वाङ्मय विभाग श्रीमती दानकुंवर महिला महाविद्यालय आणि मराठी विभाग, जे.ई.एस.महाविद्यालय,जालना यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. २१) जालना शहरात ' गुरु पाठीराखा ' या आषाढ वारी माहितीपट प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

श्रीमती दानकुंवर महिला महाविद्यालयात सायंकाळी पाच वाजता या माहिती पटाचे प्रदर्शन होणार असून या समारंभाच्या अध्यक्षस्थानी दानकुंवर हिंदी कन्या विद्यालय समितीचे अध्यक्ष महेंद्रकुमार गुप्ता असणार **पान २ वर**

## हिंदी भाषा हिच राष्ट्र भाषा होय - सुर्यवंशी



**जालना । प्रतिनिधी -** देशात सध्या हिंदी भाषा सक्तीविरोधात काही राज्यांतून टीका व आंदोलन होत असताना, हिंदी हीच आमची राष्ट्रभाषा आहे असे ठाम प्रतिपादन अखिल भारत हिंदू महासभेचे प्रदेश संघटन मंत्री धनसिंह सूर्यवंशी यांनी केले आहे. हिंदी विरोधाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात हिंदी ही केवळ संवादाचे माध्यम नसून ती संस्कृतीची वाहक व राष्ट्रएकतेची सूत्रधार असल्याचे नमूद केले आहे.

धनसिंह सूर्यवंशी यांनी पुढे म्हटले आहे की संस्कृत ही आमची देवभाषा असून तिच्यापासून निर्माण झालेली आणि तिच्याच शास्त्रीय परंपरेवर आधारित असलेली हिंदी हीच आपली प्रचलित राष्ट्रभाषा आहे, हिंदीला घटनात्मक, ऐतिहासिक व सामाजिक दृष्टिकोनातून राष्ट्रभाषेचे पात्रत्व असल्याचा पुनरुच्चार करून ते म्हणाले की, हिंदीचा राष्ट्रभाषा म्हणून स्वीकार म्हणजे इतर प्रांतिक भाषांचा अवमान नाही. बंगाली, मराठी, तमिळ, तेलुगू यांसारख्या प्रगत भाषांचे स्थानही महत्त्वाचे असून, त्या त्या प्रांतात त्यांचे संवर्धन आवश्यकच आहे. मात्र, सर्व हिंदूंच्या संपर्क व समन्वयासाठी उपयुक्त ठरणारी, संस्कृतनिष्ठ, सहजसोपे व्याकरण असलेली व देशभर प्रचलित असलेली भाषा ही केवळ हिंदीच आहे, असे ते म्हणाले.

हिंदी ही कृत्रिमरीत्या निर्माण केलेली भाषा नसून ती प्राचीन काळापासून हिंदुस्थानात व्यापारी, यात्रिक, पंडित व सैन्याद्वारे व्यवहारात वापरली जात होती. बंगाल ते सिंध आणि काश्मीर ते रामेश्वर या संपूर्ण भूमीवर एकमेकांशी संवाद करताना, हिंदीचाच उपयोग होत असे. म्हणूनच ही भाषा ऐतिहासिकदृष्ट्या देशातील सामान्य जनतेची संपर्कभाषा ठरली आहे, असा इतिहासही त्यांनी निदर्शनास आणून दिला. ही भाषा म्हणजे महर्षि दयानंद सरस्वती यांच्या 'सत्यार्थप्रकाश'सारख्या ग्रंथात आढळणारी शुद्ध संस्कृतनिष्ठ हिंदीच आहे. त्यांनी 'हिंदुस्थानी' नावाने प्रचलित असलेल्या मिश्र व अपभ्रष्ट भाषेला पूर्णतः नकार दिला असून, ती भाषा भाषिक विघटनाचे साधन ठरत असल्याचे ते म्हणाले. इंग्रजी भाषा ज्ञानासाठी उपयुक्त असलीतरी तिचे अंधानुकरण करून ती आपल्या भाषांवर थोपवणे धोकादायक आहे, असे मतही त्यांनी मांडले.बंगाली वाङ्मयाने परकीय शब्दांपासून आपली भाषा अलिप्त ठेवून **पान २ वर**

## दिनकर घेवंदे यांचा शिवसेनेत प्रवेश



**जालना । प्रतिनिधी -** कॉंग्रेस अनुसूचित-जाती विभागाचे शहरजिल्हाधक्ष दिनकर घेवंदे यांनी आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत शिवसेना पक्षामध्ये प्रवेश केला.

जालना शहरातील भाग्य नगर येथील आमदार अर्जुन खोतकर यांच्या संपर्क कार्यालवर दिनकर देवंदे यांचा प्रवेश सोहळा पार पडला.

यावेळी बोलताना घेवंदे मराठवाड्यात एकनाथ शिंदे यांचे हात बळकट करण्यासाठी मी आमदार अर्जुन खोतकर यांच्या नेतृत्वाखाली प्रवेश करतो आहे. पुढे म्हणाले की जालना जिल्ह्यात मी गेली अनेक वर्षे कॉंग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभागाचे व जनरल कॉंग्रेसची जबाबदारी सांभाळली होती परंतु कधीच चळवळीतील कार्यकर्त्यांचे येथे भले झाले नाही. फक्त एससी म्हणून सर्व समाजाचा फायदा घेणारे या कॉंग्रेसमध्ये आहेत. अनेक वर्षापासून तेथे मुस्कटदाबी होत होती. येणाऱ्या काळात अनेक कॉंग्रेस पक्षाचे नेते लाडके आमदार अर्जुन खोतकर यांच्या नेतृत्वाखाली काम करतील येथे म्हणजे शिवसेनेत सर्वांनाच न्याय मिळणार अशी आशा व्यक्त करतो.

फुले शाहू आंबेडकर यांचे विचार जोपासणारे अर्जुनराव यांच्या खांद्याला खांदा लावून काम करू, विकास पुरुष अर्जुनराव यांना कायम जालनाचे आमदार ठेऊ असे मत आंबेडकरी चळवळीचे नेते दिनकर घेवंदे यांनी मांडले. यावेळी शिवसेना **पान २ वर**

## संपादकीय

### आंतरराष्ट्रीय योग दिन

आजचा दिवस संपूर्ण जगात आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सप्टेंबर २०१४ मध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेत २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करण्यात यावा असा प्रस्ताव मांडला. २१ जून हा दिवस जगातील अनेक देशांमध्ये सर्वात मोठा दिवस आहे. पृथ्वीला सूर्याभोवती फिरण्यासाठी लागणाऱ्या वेगामुळे २१ जून हा दिवस इतर दिवसांपेक्षा मोठा असतो. २१ जून रोजी उत्तरायण संपून दक्षिणायन सुरू होते. या दिवशी दिवस मोठा तर रात्र लहान असते. २१ जून रोजी सूर्योदय लवकर होतो आणि सायंकाळी जास्त वेळेपर्यंत उजेड असतो. त्यामुळे या दिवसाला विशेष महत्व प्राप्त होते म्हणून हाच दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करावा असा प्रस्ताव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडला. पंतप्रधान नरेंद मोदी यांच्या या प्रस्तावाला संयुक्त राष्ट्र संघाच्या १९३ देशांपैकी १७५ देशांच्या प्रतिनिधींनी पाठिंबा दिला. सुरक्षा आयोगाचे कायमस्वरूपी सदस्य असलेले अमेरिका, इंग्लंड, फ्रांस, चीन, रशिया यासारखे देशही या प्रस्तावाचे सहप्रतिनीधी आहेत. या प्रस्तावावर विस्तृत चर्चा झाल्यानंतर डिसेंबर २०१४ मध्ये या दिनाला मान्यता देण्यात आली. २१ जून २०१५ रोजी पहिला आंतरराष्ट्रीय योग दिन जगभर साजरा करण्यात आला. भारतीय प्राचीन संस्कृतीत योग, योगासने, योगसाधना यांना अनन्यसाधारण महत्व आहे. प्राचीन काळापासून भारतातल्या साधुसंत, ऋषीमुनींनी योगाचे महत्व, त्याचे फायदे आणि त्याची गरज पटवून दिली आहे. तन आणि मन यांचा एकत्रित व्यायाम म्हणजे योग. आजच्या काळातील धकाधकीच्या जीवनात योगाच्या माध्यमातून आपण आपले शरीर तंदुरुस्त ठेवू शकतो ; शिवाय मनावरही चांगले संस्कार करू शकतो. भारतातील योगाची संस्कृती जागतिक पातळीवर स्वीकारली गेली आहे. जगभरातील देशांनी योग केवळ स्वीकारला नाही, तर त्याचा प्रचार आणि प्रसारही केला आहे. कोरोनारुपी महामारीच्या काळात तर योग दिनाला विशेष महत्व प्राप्त झाले होते. कोरोना सारख्या महामारीचा मुकाबला करायचा असेल तर आपल्या शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यावर भर दिला पाहिजे. नियमित व्यायाम आणि योगासन यांनी आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढू शकते. योग कसा करावा, कोणती योगासने मनाला आणि शरीराला सक्षम ठेवू शकतात यावर अभ्यासकांनी मते मांडली आहेत त्याप्रमाणे दररोज योग साधना करणे गरजेचे आहे. आज योग दिनानिमित्त एक दिवस योग करून त्याचे फोटो सोशल मीडियावर टाकून या दिनाचा इव्हेंट न करता सर्वांनी योगाचा अंगीकार करून नियमित सराव करावा. जगाने योगाला राजमान्यता दिली आहे आपणही नियमित सराव ठेवून योगसाधना केली तरच आजच्या योग दिनाचे सार्थक झाले असे म्हणावे लागेल.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

### माणसाचे कर्तव्य

माणूस म्हणून माणसाचे कर्तव्य
प्रत्येकाने आपल्या डोक्यात घ्यावे
माणूस म्हणून माणसाने असे जगावे
साऱ्या जगाने त्याच्याकडे बघत राहावे

माणसाचे कर्तव्य माणसाला कळावे
माणूस म्हणून त्याने वेळीच पार पाडावे
माणसाच्या दुःखात सहभागी होऊन
माणसाला धीर द्यावा तिथे जाऊन

संकटात सापडलेल्या माणसांना
करायची असते मदत गरजू लोकांना
गरजू लोकांच्या अडचणी लक्षात घेऊन
मदत करायची असते धावत जाऊन

माणसाचे कर्तव्य माणसाने ओळखावे
मानवता अंगीकारून मानवतेने वागावे
दारावर येतात भिक्षु त्यांना करावा दानधर्म
हेच असते मानव जातीचे खरे कर्म

अपघात झालेल्या व्यक्तीचे फोटो न काढता
त्यांना रुग्णालयात न्या कोणता विचार न करता
उतार वयात आई-वडिलांची काळजी घेऊन
त्यांचा विलाज करा दवाखान्यात नेऊन

म्हातारपणात आई-वडिलांची काठी बनवून
त्यांना जीव लावावा मायेचा आधार होऊन
आईवडिलांची सेवा हीच खरी मानवता असते
त्यांना जीवापाड जपणे माणसाचे कर्तव्य असते

माणसांनो माणसाचे कर्तव्य नका विसरू
कर्तव्य अंगीकारून मानवतेची कास धरू
इथे माणसे कमी आणि हैवान फार झालेत
माणसाचे कर्तव्य विसरून राक्षस झालेत

**- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# कर्करोग संशोधक डॉ सुलोचना गवांदे

## अमेरिकेत गेली ४० वर्षे कर्करोगावर संशोधन करणाऱ्या आणि विविध माध्यमांद्वारे कर्करोगाविषयी जनजागृती करीत असलेल्या डॉ सुलोचना गवांदे यांची प्रेरणादायी जीवन कहाणी...

कर्करोगाचे आपल्याला मागच्या दशकात प्रामुख्याने चार पाच प्रकारच माहिती होते. पण आता समजतेय की ही संख्या १०० च्या वर आहे.

कर्करोग आणि इतर आजार यातील मूळ फरक म्हणजे बहुतांश इतर रोग हे आपल्या शरीराच्या बाहेरून येणाऱ्या जीवजंतूंमुळे होतात अथवा शरीरातील इंद्रिये, स्नायू इत्यादी दुर्बळ झाल्यामुळे होतात. कर्करोग हा मात्र स्वतःच्या शरीरातील पेशीतूनच निर्माण होत असतो.

कर्करोग झाल्याचे निदान कळताच केवळ रुग्णच नव्हे तर त्याचे कुटुंबीयही गर्भगळीत होतात, इतकी या रोगाची धास्ती आहे. अशा या वेगळ्या आणि विलक्षण रोगावर सखोल संशोधन करणाऱ्या,तो होऊच नये म्हणून आणि झालाच तर त्याच्याशी कसा सामना करायचा यासाठी जनजागरण करणाऱ्या डॉ सुलोचना गवांदे यांच्याशी न्यूज स्टोरी टुडे पोर्टलच्या माध्यमातून आमचा संबंध आला आणि त्यांच्या कार्याने प्रभावित होऊन आम्ही त्यांना यथाशक्ती मदत करण्याचा प्रयत्न करू लागलो आणि करीत आहोत.


डॉ सुलोचना गवांदे या मूळ मुंबईकर आहेत ही आपल्या सर्वांसाठी मोठी अभिमानाची बाब आहे. त्यांचे शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण मुंबईतच झाले. त्यांनी टाटा मेमोरियल सेंटरशी संलग्न कर्करोग संशोधन संस्थेतून एम एससी व पीएच डी या पदव्या प्राप्त केल्या. पुढे कर्क रोगावर प्रगत संशोधन करण्यासाठी ४० वर्षांपूर्वी अमेरिकेत जाण्याचे धाडस त्यांनी केले.

डॉ सुलोचना गवांदे मॅडम सुरुवातीला फार बिकट परिस्थितीत कर्क रोगावरचे संशोधन करीत राहिल्या आणि अजूनही करीत आहेत. पण त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी केवळ संशोधन,शास्त्रीय अभ्यास आणि या विषयावर होणाऱ्या जागतिक परिषदांपुरतेच स्वतःला बंदिस्त करून ठेवले नाही तर सामान्य माणसाला कर्करोगाची, त्या विषयी सुरू असलेल्या संशोधनाची अद्ययावत माहिती मिळावी, त्यांना धीर - दिलासा मिळावा म्हणून त्या अनेक प्रकारे प्रयत्न करीत असतात. त्यांचे दीर्घकाळ परदेशात वास्तव्य असले तरी त्यांनी त्यांची मायभूमीशी आणि माय मराठीशी असलेली नाळ तुटू दिली नाही. त्यामुळेच कर्करोगाविषयीची जाणीव, जागृती ही मराठी समाजापर्यंत पोहोचण्यासाठी त्या भरीव कामगिरी करीत असतात.

डॉ सुलोचना गवांदे यांनी २०१६ मध्ये महाराष्ट्र टाइम्स या वृत्तपत्रात पंधरवाड्याला एक लेख असे सदर वर्षभर लिहिले. या सदरातून त्यांनी कर्करोगाचा इतिहास, कारणे व लक्षणे, उपचार हे सर्व विषय अतिशय सोप्या भाषेत मांडले. वाचकांना ही लेखमाला अत्यंत उपयुक्त वाटली. नंतर या लेखनावर आधारित त्यांचे कर्करोगः माहिती आणि अनुभव हे पुस्तक प्रकाशित झाले. पुढे या पुस्तकात अधिक भर घालून त्याचे इंग्रजी रूपांतर ठर्शींशरश्रळपस ींहश ड्शलीशींी`ष उरपलशी या नावाने २०२२ मध्ये अमेरिकेत व नंतर भारतात प्रकाशित केले गेले. गेल्या वर्षीच्या (२०२४) मराठी व इंग्रजी कालनिर्णयच्या पृष्ठभागावर कर्करोगाची कारणे आणि तो टाळण्यासाठी काय करावे याबद्दल त्यांनी लिहिलेले लेख प्रसिद्ध झाले आहेत.महाराष्ट्र टाइम्सच्या जानेवारी २०२५ मधील रविवार पुरवणीत त्यांचा कर्करोगाच्या लसीबद्दल सद्यकालीन शास्त्रीय माहिती देणारा लेख प्रसिद्ध झाला आहे.



कर्करोगाविषयी बोलण्यासाठी गवांदे मॅडम यांना विविध प्रसार माध्यमांद्वारे निमंत्रित करण्यात येत असते. त्या नेहमीच योग्य माहिती देण्याचा आग्रह धरतात. इथे योग्य शब्द जाणीवपूर्वक वापरलेला आहे, तो अशासाठी की अनेक व्यक्ती,संस्था कर्करोग बरा करण्याविषयीचे अवास्तव दावे करीत असतात. त्यांच्या उपचारांमुळे रुग्ण बरा तर होत नाहीच उलट त्याचे शारीरिक, मानसिक, आर्थिक नुकसानच होत असते.




कर्करोगाचे अनेक प्रकार योग्य औषधोपचारांनी पूर्ण बरे होतात किंवा कित्येक वर्षे आटोक्यात राहतात. नको त्या गोष्टींच्या मागे लागण्याने हे इलाज वेळेवर होत नाहीत, परिणामी रुग्णाचा आजार अधिक गंभीर होतो आणि कित्येकदा रोग कह्यात आणणे अशक्य होते. ही अत्यंत दुर्दैवी परिस्थिती आहे आणि याबद्दल लोकांना जागरूक करणे आवश्यक आहे. म्हणून गवांदे मॅडम मुद्रित माध्यमापुरत्याच मर्यादित राहिल्या नाहीत तर आकाशवाणी, दूरचित्रवाणी, समाज माध्यमे, प्रत्यक्ष व्याख्याने, संवाद,मुलाखती अशा विविध प्रकारच्या माध्यमंद्वारे त्या कार्यरत आहेत. अर्थात खरं म्हणजे ही काही फक्त त्यांचीच किंवा सरकार, संशोधक आणि डॉक्टरांची पण नाही तर ही जागरूकता वाढवणे हे काम तुम्हा आम्हा सर्वांचेच आहे. इतकी ही कर्करोगाची समस्या भीषण आहे.

गवांदे मॅडम यांच्या कर्करोगः माहिती आणि अनुभव या पुस्तकातील सर्व लेख मुंबई आकाशवाणीच्या निवेदिकांनी वाचून महाराष्ट्रातील केंद्रांवर प्रसारित केले. अमेरिकेत येल (धरश्रश) विद्यापीठाच्या कर्करोग समितीने छझठ रेडिओवर या पुस्तकावर आधारित डॉ गवांदे यांचा कार्यक्रम प्रसारित केला.

डॉ गवांदे मॅडम गेल्या वर्षी मुंबईत आलेल्या असताना, त्यांचे विचार एबीपी माझा वाहिनीवर प्रसारित होण्याचे महत्व मी ज्या वेळी या वाहिनीचे संपादक श्री राजीव खांडेकर यांना सांगितले, त्यावेळी त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता डॉ गवांदे मॅडम यांची मुलाखत घेतली. या त्यांच्या कार्यक्रमाला खूप प्रतिसाद मिळाला. त्यांची ही मुलाखत आपण आजही यू ट्यूब वर पाहू शकता आणि आपण ती अवश्य पाहावी देखील. त्यांचे मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेत पॉडकास्ट प्रसिद्ध झाले असून ते देखील यू ट्यूब वर उपलब्ध आहेत.

कर्करोगाविषयी प्रसार माध्यमांद्वारे जनजागृती करीत असतानाच गवांदे मॅडम लहानमोठ्या सभांतून लोकांना प्रत्यक्ष भेटून बोलत असतात. न्यूज स्टोरी टुडेच्या ठाणे येथील मेघना आणि हेमंत साने यांच्या घरी झालेल्या स्नेह मिलन कार्यक्रमात मेघना साने यांनी त्यांची घेतलेली उस्फुर्त मुलाखत आणि त्या नंतरची प्रश्नोत्तरे खूपच उद्बोधक ठरली. आकाशवाणीचे निवृत्त सहसंचालक भूपेंद्र मिस्त्री यांनी त्यांच्या कॅमेरा टीमद्वारे या मुलाखतीचे चित्रीकरण करून ती समाज माध्यमातून प्रसिद्ध केली. ही मुलाखत त्या स्नेह मिलन कार्यक्रमाचे मोठेच वैशिष्ट्य ठरले.

कर्करोगासारखे आजार हे विश्वव्यापी आहेत. ते कधीही, कुणालाही, कुठेही होऊ शकतात. त्यांची लक्षणे, उपाय आणि मुख्य म्हणजे प्रतिबंधक प्रयत्न हे सर्वसामान्य माणसापर्यंत पोचले तर रुग्णांना तर दिलासा मिळेलच परंतु या रोगाचे प्रमाण कमी होण्याची शक्यता वाढेल. हे ज्ञान बहुसंख्य लोकांपर्यत पोचावे म्हणून गवांदे मॅडमचे कर्करोगः माहिती आणि अनुभव हे पुस्तक जगातील अन्य भाषेत अनुवादित करण्यासाठी त्या त्या भाषिक व्यक्ती आणि संस्था यांनी स्वतःहून पुढे येण्याची गरज आहे.

गवांदे मॅडम इतक्या गंभीर विषयाशी निगडित असल्यामुळे त्या खूप कडक स्वभावाच्या, चेहऱ्यावर अती गंभीर भाव असलेल्या असतील,असे आपल्याला वाटेल. प्रत्यक्षात मात्र त्यांचा वागण्या-बोलण्यातील सहजपणा,आत्मियता पाहून पहिल्याच भेटीत त्या आपल्या आणि आपण त्यांचे होऊन जातो. गर्व आणि अहंकाराचा लवलेश देखील त्यांच्यात नाहीये. कर्करोगावर संशोधन करणाऱ्या, त्या विषयी लिहिणाऱ्या, बोलणाऱ्या, जगभर होणाऱ्या परिषदांना सातत्याने उपस्थित राहणाऱ्या गवांदे मॅडम त्या याच का असा प्रश्न त्यांना पहिल्यांदाच भेटणाऱ्या व्यक्तीस निश्चितच पडत असणार यात मला तरी काही शंका वाटत नाही. कर्करोगासारख्या गंभीर विषयावर संशोधन आणि सामाजिक जागरूकता करीत असतानाच ललित लेखन ही त्या खूप सुंदर करतात. मराठी भाषेवर त्यांचे उत्तम प्रभुत्व आहे. त्यांचे काही ललित लेख न्यूज स्टोरी टुडे पोर्टल आणि अन्य ठिकाणी प्रसिद्ध झाले आहेत.

आम्हा भुजबळ कुटुंबीयांसाठी गवांदे मॅडम यांची एक अविस्मरणीय आठवण आहे. आमची कन्या देवश्री हिने

कोलंबिया विद्यापीठातून दोन वर्षांपूर्वी जेव्हा एम एस जर्नालिझम ही पदवी मिळवली होती,तेव्हा आम्ही पदवीदान समारंभासाठी अमेरिकेत गेलो असता त्यांनी आम्हा तिघांनाही त्यांच्या

न्यू जर्सी येथील घरी अतिशय अगत्याने बोलावले होते. पोर्टलच्या दुसऱ्या लेखिका, न्यू जर्सी येथीलच डॉ गौरी आणि त्याचे पती आशिष कंसारा यांना देखील आमंत्रित केले होते. त्यामुळे देवश्री चे एम एस चे सेलिब्रेशन आणि पोर्टलचे स्नेह मिलनच त्यांच्या घरी झाले.

या लेखाचे परीक्षण करताना गवांदे मॅडम यांनी एकच इच्छा व्यक्त केली ,ती म्हणजे वाचकांनी त्यांचे पुस्तक किंवा यू ट्यूबवर उपलब्ध असलेले कार्यक्रम पाहून कर्करोगाबद्दल यथायोग्यरित्या जाणून घ्यावे आणि त्याबद्दल इतरांशी बोलावे. त्यातून बोध घेऊन या भयंकर व्याधीपासून स्वतःला आणि आपल्या कुटुंबाला कसे दूर ठेवता येईल हे शिकावे, त्यादृष्टीने प्रयत्न करावेत. वाचकांना तर्कनिष्ठ विचार करण्यास प्रवृत्त करावे, त्यांनी अंधश्रद्धा किंवा भूलथापांना बळी पडून पैसे अथवा मूल्यवान वेळ वाया घालवू नये, जर कुणाला कर्करोगाचा सामना करण्याची वेळ आली ते सुजाणपणे, धैर्याने करण्यास मार्गदर्शन मिळावे, या हेतूने कर्करोगाच्या उपचारांवर चालणारे संशोधन व नवीन औषधे यांची माहिती दिली आहे. यामुळे सर्वसाधारण व्यक्तीची कर्करोगाविषयीची जाण वाढावी अशी त्यांची सार्थ अपेक्षा आहे.

मी, माझे कुटुंब, माझी नोकरी, माझा व्यवसाय इतकेच आपले जग सीमित न ठेवता या अवघड आणि गहन रोगाबद्दल साध्या भाषेत शास्त्रोक्त माहिती देत असलेल्या आणि आपल्याला कर्करोग होऊच नये म्हणून आपली जीवनशैली कशी असावी, या विषयी आंतरिक तळमळीने काम करीत असलेल्या डॉ सुलोचना गवांदे या स्वार्थ आणि परमार्थ याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. त्यांच्या या मानवतावादी प्रयत्नांमध्ये, उपक्रमांमध्ये आपण काही हातभार लावू शकत असल्यास अवश्य लावू या.

**देवेंद्र भुजबळ**

# औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील तासिका निदेशकांना न्याय

## ५ वर्षांपेक्षा जास्त सेवा झालेल्या निदेशकांची परीक्षा घेऊन उत्तीर्ण होणाऱ्यांना नियमित करण्याचे मंत्री लोढा यांचे निर्देश




**मुंबई -** ज्या शिल्प निदेशकांनी ५ वर्षांपेक्षा जास्त काळ विभागामध्ये कार्य केले आहे, त्यांची परीक्षा घेऊन उत्तीर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना नियमित करण्यात यावे असे लेखी निर्देश कॅबिनेट मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या संचालकांना दिले. माजी मंत्री शोभाताई फडणवीस यांनी तासिका निदेशकांना नियमित करण्याबाबत कॅबिनेट मंत्री मंगल प्रभात लोढा यांना पत्राद्वारे विनंती केली होती. यानंतर मंत्री श्री. लोढा यांनी पत्राची तातडीने दखल घेत, संबंधित अधिकाऱ्यांना सकारात्मक चर्चा करून योग्य कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाने सुद्धा या संदर्भात कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री श्री. मंगलप्रभात लोढा यांची सदर विषयाबाबत भेट घेतली. सद्यस्थितीत अनेक औ. प्र. संस्थांमध्ये तासिका तत्वावर कार्यरत निदेशकांच्या रिक्त जागा मोठ्या प्रमाणात असल्याने, त्यांना परीक्षा घेऊन नियमित करावे, अशी मागणी करण्यात आली होती. तासिका तत्वावर काम करणाऱ्या निदेशकांची ५ वर्षे व त्याहून अधिक काळ ज्यांची सेवा झाली आहे किंवा किमान पात्रता (खढख, उढख, पदविका व पदवी) धारण करतात, त्यांची परीक्षा घेऊन नियमित करण्यात यावे असे निवेदन अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाने केले आहे.

### पान १ वरुन

#### जालन्यात गुरु ...

आहेत. प्रमुख अतिथी म्हणुन ज्येष्ठ साहित्यिक बसवराज कोरे यांची उपस्थिती असणार आहे. सुप्रसिद्ध लेखक, कवी, पत्रकार विनोद जैतमहाल, छत्रपती संभाजीनगर येथील सुप्रसिद्ध कवी श्रीधर नांदेडकर प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित असणार आहेत. कुंभारझरी येथील दिंडी मार्गदर्शक ह.भ.प.सोनुने गुरुजी, जे.ई.एस.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, सुप्रसिद्ध फिल्म एडिटर अभिजित चव्हाण यांची या कार्यक्रमाला विशेष उपस्थिती असणार आहे.

जालना शहर आणि परिसरातील जास्तीत जास्त नागरिकांनी पालखी दर्शन व माहितीपट प्रदर्शन आणि कीर्तन श्रवणाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्रीमती दानकुंवर महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी.तळेकर, जे.ई.एस.महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख डॉ.यशवंत सोनुने, श्रीमती दानकुंवर महिला महाविद्यालयातील मराठी भाषा व वाङ्मय विभाग प्रमुख डॉ.वासुदेव उगले यांनी केले आहे.

#### हिंदी भाषा ...

आदर्श प्रस्थापित केला आहे, असे सांगत त्यांनी इतर भाषांनीही अशाच प्रकारची शुद्धता ठेवावी असे आवाहन केले.

हिंदू विद्यार्थ्यांनी दुय्यम शिक्षणात हिंदीचे शिक्षण आवश्यक विषय म्हणून घ्यावे, असेही सूर्यवंशी यांनी सुचवले. संस्कृतसह हिंदीचा अभ्यास हे आपल्या सांस्कृतिक आणि राष्ट्रीय मूल्यांचे रक्षण करणारे पाऊल ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

#### आमदार अर्जुनराव ...

संपर्कप्रमुख सुनील किनगावकर, शिवसेना शहरप्रमुख विष्णु पाचफुले, गणेश राऊत, गणेश सुपरकर, महेश दुसाने, दिनेश भगत, निखिल पगारे, राधाकिशन दाभाडे, राहुल हिवराळे, बाळकृष्ण कोत्ताकोंडा, योगेश रत्नपारखे, युवासेना जिल्हासमन्वयक शुभम टेकाळे सह शिवप्रेमी आणि भीम अनुयायी उपस्थित होते.

# खरपुडी येथे नीट, जेईईतील गुणवंतांचा सत्कार




**जालना । प्रतिनिधी -** खरपुडी येथील मराठवाडा शेती सहाय्य मंडळ संचलित बळीराजा करियर अॅक्डमीत प्रशिक्षण घेवून नीट, जेईई आणि सीईटी परीक्षेत यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार दि.२० जुन २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते संपन्न झाला. कार्यक्रमास डॉ. राजेंद्र बारवाले, प्रा.सुरेश लाहोटी, प्रा.एखंडे, प्रा.वासरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

ग्रामीण भागातील परिस्थितीने गरीब असलेल्या हुशार व गरजवंत विद्यार्थ्यांना मोठ्या शहरात जावून शिकवणी लावणे शक्य होत नाही. त्यामुळे जिल्ह्यातील २० मुली व २० मुले असे एकुण ४० विद्यार्थ्यांना निवास, भोजन व शिक्षणासाठी इयत्ता अकरावी व बारावी या दोन वर्षासाठी १०० टक्के शिष्यवृत्ती ही प्रवेश पात्रता परीक्षेतून निवडलेल्यांना बळीराजा करियर अॅक्डमीकडून देण्यात येते. यावेळी बळीराजा करियर अॅक्डमीची विद्यार्थीनी कु. साक्षी लक्ष्मण काटे हिने जेईई डव्हान्समध्ये चांगली टक्केवारी मिळवून आयआयटीला पात्र ठरली आहे. तसेच नीट परीक्षेत यश संपादन करत ओम अशोक शेळके एम्सला तर विशाल बेवले आदि एमबीबीएस प्रवेशासाठी पात्र ठरला आहे.

नविन्यपुर्ण उपक्रमाला सुरूवात

# उसतोड कामगार मुलासाठी आनंददायी शिक्षणाची जत्रा उपक्रम

**परतूर । प्रतिनिधी -** जालना जिल्हा परीषद जालना व मराठवाड ग्रामीण विकास संस्था छत्रपती संभाजीनगर याच्या संयुक्त विद्यमाने जालना जिल्हातील परतुर घनसावंगी तालुक्यातील एकुण ३० गावात उसतोड कामगार मुलासाठी गावातील शाळेत गोडी लागावी वगावात राहुन शिक्षण घ्यावे यासाठी क्रिएटिव्ह ऍक्टिव्हिटी व काहीतरी नवीन आणि मूळ तयार करण्याची किंवा विचार करण्याची क्रिया. यात कला, हस्तकला, संगीत, नाटक, नृत्य, कथाकथन, आणि इतर अनेक गोष्टींचा समावेश होतो. ह्या ऍक्टिव्हिटीज (क्रियाकलापांमुळे) मुलांची कल्पनाशक्ती, समस्या सोडवण्याची क्षमता आणि आत्मविश्वास वाढतो.

कल्पनाशक्ती आणि सर्जनशीलता वाढवते:

नवीन गोष्टी तयार करणे किंवा विचार करणे, मुलांना त्यांच्या कल्पनाशक्तीचा वापर करण्यास प्रोत्साहित करते, ज्यामुळे त्यांची सर्जनशीलता वाढते.या हेतुने परतुर घनसावंगी तालुक्यातील प्रकल्प गावातील उसतोड मुलासाठी कार्यक्रम आखणी करण्यात आली

या साठी मराठवाड ग्रामीण विकास संस्था वतीने उपक्रम सुरूवात करण्यात आली तसेच उसतोड कामगाराना व बालकाना पोषन मिळावे म्हणुन परसबाग किट वाटप करण्यात येत आहे या संस्थेचे प्रकल्प संचालक अप्पासाहेब उगले प्रकल्प संपर्क प्रमुख भाउसाहेब गुजाळ प्रकल्प व्यवस्थापक आश्वजित जाधव जिल्हा समन्वयक एकनाथ राउत गाव स्वयंसेवक राजेश वाघमारे सुरेखा वाघमारे अजय गाढे आकाश चैगुलै योगेश आढे महादेव खरात हे उपस्थित होते.




# आरोग्यासाठी योगा, पारंपरिक खेळ व वृक्ष लागवड काळाची गरज

संयुक्त राष्ट्र परिषदेत प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदी यांनी २१जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्याचा प्रस्ताव ठेवला होता.त्यानंतर ११ डिसेंबर २०१४ ला संयुक्त राष्ट्र महासभेने दरवर्षी २१ जूनला जागतिक योग दिन म्हणून मान्यता देण्याचे मान्य केले आणि २१ जून २०१५ ला पहिले आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरे केल्या गेले.योगाला भारत सरकारने जागतिक दर्जा देवून भारताची मान जगात उंचावली आहे याचे मी स्वागत करतो.योग व्यायामाचे आणि आरोग्याचे प्रभावशाली माध्यम असुन शरीरांच्या अवयवांचाच नव्हे तर मन,मेंदू आणि आत्म्याचे संतुलन ठेवण्याचे काम योगाच्या माध्यमातून होत असते.योग ही भारतातील ५ हजार वर्षे जुनी परंपरा असुन शारीरिक,मानसिक आणि आध्यात्मिक साधना आहे. त्यामुळे ऋषी-मुनी, तपस्वी यांनी योग संस्कृती अवलंबली होती.आरोग्य रक्षणासाठी योगा व व्यायाम अती आवश्यक आहे.अत्याधुनिक युगात व बदलत्या काळानुसार मानवजातीला मनमोकळे पणाने बागडण्या करीता जागा किंवा ग्राउंड अपुरे पडताना दिसतात.कारण आधुनिक युगात आपण कुठेही नजर फिरवली तर आपल्याला गगनचुंबी इमारती, कारखाने, उद्योगधंदे मोठ्या प्रमाणात दिसुन येतात.अशा परीस्थितीत लहान-मोठी,आबाल-वृध्द खुल्या हवेत बागडु शकत नाही.परंतु शरीराला व्यायाम सुध्दा आवश्यक असतो. अशा वेळेला आपण योगा,व्यायाम शाळा व जिमचा सहारा घेवून शरीराला सुदृढ ठेवण्याचा प्रयत्न सर्व करतात. पुर्वी अनेक मातीतील खेळ खेळले जायचे व जखमा सुध्दा व्हायच्या परंतु या जखमा त्याच मातीने दुरूस्त सुध्दा व्हायच्या.अशा परीस्थितीत शरीराच्या प्रत्येक अवयवांचा व्यायाम होत असे. परंतु कालांतराने मोबाईलच्या छंदामुळे संपूर्ण जुने छोटे-मोठे खेळ लुप्त होतांना दिसतात.परंतू शारिर सुदृढ व निरोगी ठेवण्यासाठी व्यायाम अती आवश्यक आहे.योगाच्या सहाय्याने आपण घरबसल्या व्यायाम करू शकतो.आज जगातील १९० देशांनी योगाभ्यास अंगीकारला आहे.यात अनेक मुस्लिम राष्ट्र सुध्दा आहेत.हा भारताचा मोठा मान आहे.कारण समाजातील प्रत्येक कुटुंबातील लहान-मोठे योगाभ्यास करून आपले आरोग्य सुदृढ ठेवु शकतो. आजच्या परिस्थितीत मुल पुढील भविष्याच्या वाटचालीकरीता अभ्यात मग्न असतात आणि मनोरंजनाचे साधन म्हणून भारतासह जगातील ८० टक्के जनता मोबाईलच्या व कांम्पुटरच्या आदीन झाल्याचे दिसून येते.यामुळे डोक्यावर तान येणे,डोळे दुखने,मेंदुवर परीनाम होने इत्यादी अनेक विकार मोबाईलमुळे व कांपुटरमुळे होतांना आपण पहातो.परंतु यावर निराकरण करण्याचे काम योगा करणे,व्यायाम करणे,जिमनॅस्टिक,किंवा जिमच्या माध्यमातून शरिरयष्टी सुदृढ ठेवने अत्यंत गरजेचे आहे.आपण योगाभ्यासचा विचार केला तर भारतात अनेक युगानु- युगापासुन योगाभ्यास ऋषी-मुनी,साधु-संत, महायोगी,तपस्वी इत्यादी अनेक महान विभूती झाडाखाली योगसाधना करायची. परंतु आज वाढते प्रदुषण,धावपळीचे जीवन, ग्लोबल वार्मिंग, वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरण व बदलते हवामान यामुळे खुला व्यायाम करण्यास अनेक अडचणी निर्माण होतात.परंतु योगाभ्यास चार भिंतींच्या आत सुध्दा करता येतो.त्यामुळेच जगातील अनेक देशांनी योगाभ्यासला जास्त महत्व दिले आहे. भारताने योगाला जागतिक पातळीवर नेऊन भारत योगगुरू बनला आहे. त्याचप्रमाणे भारताने योगाभ्यास जागतिक पातळीवर नेऊन जगाला व्यायामाची व शरिर सुदृढ ठेवण्याची मोठी दीशा देण्याचे काम सुद्धा केले आहे.भारत जागतिक पातळीवर लोकांचे जीवन उंचावण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील रहाला आहे.योग दिनाच्या निमित्ताने सर्वांनीच योगाभ्यास अंगीकारला पाहिजे. योग दीनाच्या निमित्ताने प्रदुषणावर मात करण्यासाठी प्रत्येकांनी घर तीथे झाड ही मोहीम राबवुन या दीवसाला आगळेवेगळे ऐतिहासिक महत्व देवुन वृक्षारोपण केले पाहिजे. कारणआरोग्यासाठी वृक्ष ही सर्वांसाठी संजीवनी आहे. आपल्या राज्यात ३६ जिल्हे, प्रत्येकात साधारण ५ तालुके, म्हणजे १८० तालुके व राज्यात आमदार २८८ (वि.परिषदचे वेगळेच) वृक्षारोपण हा मुद्दा आमदार, कलेक्टर, बीडीओ,असे अनेक जबाबदार अधिकारी मिळून प्रशासनाने व सामाजिक संघटनांनी योग दिनाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करायला हवी. जागतिक योग दिवस महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात साजरा होणार आहे. आजच्या परिस्थितीत ज्याप्रमाणे मनुष्याच्या आरोग्यासाठी योगाकरणे आवश्यक आहे.त्याच प्रमाणे ऑक्सिजनची मात्रा वाढविण्यासाठी वृक्षारोपण करने अत्यंत गरजेचे आहे.याकडे मुख्यत्वेकरून प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे.योग दिनाच्या निमित्ताने प्रशासने,शाळा, महाविद्यालये, एसटी स्टँड, संपूर्ण प्रशासकीय ठिकाणे, कारागृह या संपूर्ण ठिकाणी जागतिक योग दिनाच्या निमित्ताने वृक्षारोपण व्हायला हवे. यामुळे जागतिक विक्रम होईलच सोबत आरोग्याची जोपासना सुध्दा होईल.अशाप्रकारे योगासोबत आरोग्यासाठी वृक्षारोपण चळवळ पुढे नेली पाहिजे.कारण ह्या संपूर्ण बाबी आरोग्याशी निगडित आहे. योगाभ्यासमुळे शारीरिक, मानसिक, आध्यात्मिक, आरोग्य आणि शांतीसाठी याचा मोठ्या प्रमाणात लाभ मिळतो. त्यामुळेच जगातील १९० देशांनी योगाला स्विकारले आहे. भारतातच नाही तर संपूर्ण जगात वाढते नवीन-नवीन आजार चिंतेचा विषय आहे.त्यामुळे योग साधना करून व्यायाम करणे तेवढेच आवश्यक आहे.कारण आरोग्य हिच संपत्तीहा मुलमंत्र सर्वांनीच अंगीकारला पाहिजे.योग दिनाच्या निमित्ताने केंद्र सरकारने व राज्य सरकारने राष्ट्रीय खेळांना महत्व देवून व्यायाम करण्याची प्रवृत्ती जागृत करण्याची गरज आहे. जगातील प्राचीन संस्कृती भारतात आताही आहे. त्यामुळे आपल्याला योग परंपरेच्या माध्यमातून ती पहायला मिळते. त्यामुळे आज योगाभ्यास जगासाठी अनमोल रत्न व संजिवनी सिध्द होत आहे. याचा भारतीयांना अभिमान आहे. योग दिनाच्या निमित्ताने ऑक्सिजनची मात्रा वाढवीन्यासाठी आपण सर्वांनी वृक्षारोपणाचा संकल्प करावयास पाहिजे. कारण पुर्वी ऋषी मुनी,तपस्वी,महाग्यानी झाडाखालीच योगाभ्यास करायचे, त्याचप्रमाणे पुर्वी शिक्षण सुध्दा झाडाखालीच व्हायचे यावरून स्पष्ट होते की वृक्षा शिवाय पुढचे पाऊल अवघड असते. त्यामुळे आरोग्याच्या दृष्टीने व योग दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्रासह भारतात जास्तीत जास्त वृक्षारोपण कसे करता येईल याकडे सरकारने व सामाजिक संघटनांनी लक्ष देण्याची गरज आहे. योगा करूया;व्यायाम करूया; वृक्ष लावुया; वृक्ष जगवुया आणि निसर्गाचा समतोल राखण्याचा संकल्प करूया.जय हिंद!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त जिल्हा क्रीडा संकुलावर सामुहीक योग शिबिराचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** पंतप्रधान महोदयांनी सन २०१४ च्या राष्ट्रीय महासभेत दि.२१ जुन हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणुन दरवर्षी साजरा करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतलेला आहे. दि. २१ जुन २०२५ रोजी जागतिक योग दिन दिनाचे औचित्य साधुन जिल्ह्यात दि. २१ जुन २०२५ रोजी सकाळी ६.३० वाजता जिल्हा क्रीडा संकुल, जालना येथे सामुहिक योग शिबीर प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील मुख्यालयाच्या ठिकाणी जिल्हा प्रशासन, जिल्हास्तर योग समिती, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, शिक्षणाधिकारी कार्यालय, क्रीडा भारती, जिल्हा योग संघटना, आयुष विभाग जालना, जिल्हा युवा अधिकारी, नेहरू युवा केंद्र, विविध योग संघटना, जिल्हा स्काऊट गाईड, तंत्र निकेतन महाविद्यालय व जिल्हा एकविध क्रीडा संघटना, विविध क्रीडा मंडळे यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २१ जुन २०२५ रोजी सकाळी ६.३० वाजता जिल्हा क्रीडा संकुल, जालना येथे सामुहिक योगा व प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर योग प्रात्यक्षिकासाठी येताना पांढरा सुटसुटीत ड्रेस असावा, सोबत मॅट/सतरंजी, पाणी बॉटल व नॅपकीन असावा. दि. २१ जुन २०२५ रोजी सकाळी ६.३० वाजता जिल्हा क्रीडा संकुल, जालना येथे सामुहिक योगा व प्रात्यक्षिकासाठी जिल्हयातील जास्तीत जास्त अधिकारी कर्मचारी, खेळाडू, क्रीडा संघटक, क्रीडा प्रेमी, युवक युवती यांनी सहभागी व्हावे. अधिक माहितीसाठी क्रीडा मार्गदर्शक सिध्दार्थ कदम (मो.नं.८९७५३३३५९४), आशिष जोगदंड (मो.नं.८८८८३४६८२८), श्रीमती लता लोंढे (मो.नं.९८५०३३३३२६) श्रीमती आरती चिल्लारे, ( मो.नं.७७५८८६३९९१) यांच्याशी संपर्क साधावा. असे जिल्हा क्रीडा अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# पवित्र शिक्षक भरती टप्पा-२ साठी 'ओपन कन्व्हर्टेड राउंड' तात्काळ घ्यावा

## शेख अब्दुल रहीम यांचे शालेय शिक्षण सचिव, आयुक्तांना निवेदन

**मुंबई -** महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनेचे राज्य प्रवक्ते तसेच हॅपी टू हेल्प फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम यांनी दिनांक १६ जून २०२५ रोजी मा. प्रधान सचिव (शालेय शिक्षण विभाग) आणि शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांना निवेदनाद्वारे मागणी केली की, उर्दू माध्यमातील शिक्षक भरती प्रक्रियेतील टप्पा-२ मधील पुढील कार्यवाही तात्काळ पार पाडावी.

या टप्प्यात उर्दू माध्यमासाठी एकूण २५८ जागा घोषित करण्यात आल्या होत्या, मात्र केवळ १०० उमेदवारांचीच नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे उर्वरित १५८ जागा रिक्त राहिल्या असून, त्यामुळे अनेक उमेदवार व शिक्षणप्रेमींमध्ये नाराजीचा सूर आहे.

या पार्श्वभूमीवर, शेख अब्दुल रहीम यांनी शासनाकडे मागणी केली आहे की, उर्वरित पात्र उमेदवारांना संधी देण्यासाठी 'ओपन कन्व्हर्टेड राउंड' तात्काळ आयोजित करून त्यांच्यावर न्याय करावा.



माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी ठामपणे सांगितले की, जोपर्यंत या भावी शिक्षकांना न्याय मिळत नाही, तोपर्यंत आमचा लढा सुरूच राहील.

**झाडे लावा झाडे जगवा**

दीपसन रेमेडी




वृत्तपत्रे (दैनिक, साप्ताहिक) पेज सेटींग
वेब पोर्टल, युट्युब चॅनल
वृत्तपत्रांचे वार्षिक विवरण
नविन शिर्षक (वृत्तपत्र) नोंदणी ऑनलाईन अर्ज
वृत्तपत्रांशी निगडीत सर्व प्रश्नांचे अल्पदरात उपाय
वृत्तपत्र, वेब पोर्टल नोंदणी संदर्भात संपूर्ण मार्गदर्शन
अधिस्विकृती पत्रिकेसंदर्भात संपूर्ण मार्गदर्शन
वृत्तपत्र शासनमान्य यादीत समाविष्ट करण्यासाठी मार्गदर्शन
9975387225 8390098886

# अतिवृष्टी अनुदान घोटाळा; फौजदारी गुन्हे दाखल करून एसआयटी चौकशी आणि दोषींची मालमत्ता जप्तीची आमदार लोणीकर यांची मागणी

जालना । प्रतिनिधी - जिल्ह्यातील अतिवृष्टी आणि गारपिटीमुळे दुखावलेल्या शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणाऱ्या १०० कोटींच्या अनुदान घोटाळ्याचा पर्दाफाश करणाऱ्या परतूर विधानसभा मतदारसंघाचे ज्येष्ठ आणि निष्ठावान आमदार बबनराव लोणीकर यांच्या आक्रमक पाठपुराव्याला यश मिळाले आहे. या भ्रष्टाचाराच्या काळ्याकुट्ट गर्तेतून शेतकऱ्यांचा हक्काचा पैसा परत मिळवण्यासाठी त्यांनी प्रशासनाला खड्ड्यात घेतले असून, दोषींवर कठोर कारवाई आणि पारदर्शक चौकशीची मागणी लावून धरली आहे.

**भ्रष्टाचाराचा कळस गाठणारा घोटाळा**

जालना जिल्ह्यात २०२२ ते २०२४ दरम्यान अतिवृष्टी, पूर आणि गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. शासनाने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी ४१२ कोटींचे अनुदान मंजूर केले, परंतु यापैकी ४० कोटी रुपये बनावट शेतकरी दाखवून, दुबार अनुदान देऊन आणि शासकीय जमिनींच्या नावावर लाटण्यात आले. जिल्हाधिकाऱ्यांच्या अहवालानुसार ३४.९७ कोटींचा अपहार उघड झाला असला, तरी आमदार लोणीकर यांनी हा घोटाळा १०० कोटींपेक्षा जास्त असल्याचा गंभीर आरोप केला आहे. अंबड, घनसावंगी, भोकरदन आणि जाफराबाद तालुक्यांमध्ये तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यकांनी संगनमताने हा घोटाळा घडवला असल्याचे त्यांनी ठणकावले आहे.

**लोणीकरांचा आक्रमक पाठपुरावा**

१४ जून २०२५ रोजी जालना येथील जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्यासमोर आमदार लोणीकर यांनी या घोटाळ्याचा जाहीर पर्दाफाश केला. हा केवळ आर्थिक अपहार नाही, तर शेतकऱ्यांच्या विश्वासाचा आणि हक्काचा खून आहे. ज्या शेतकऱ्यांनी सर्वस्व गमावले, त्यांच्या तोंडचा घास हिरावणाऱ्या भ्रष्ट अधिकाऱ्यांना तुरुंगात डांबले पाहिजे, असे त्यांनी संतप्तपणे सांगितले. त्यांनी तात्काळ एसआयटी किंवा सीबीआय चौकशी, दोषींची मालमत्ता जप्ती आणि कठोर फौजदारी कारवाईची मागणी केली. यासह, मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांतील अनुदान वाटपाची सखोल चौकशी व्हावी, असेही त्यांनी सुचवले.

**आतापर्यंतच्या कारवाया**

लोणीकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे जिल्हा प्रशासनाला कारवाईसाठी पुढे यावे लागले. आतापर्यंत २१ अधिकारी निलंबित झाले असून, यामध्ये १० तलाठी (मागील आठवडा) आणि ११ जण (१९ जून २०२५) यांचा समावेश आहे. निलंबित कर्मचाऱ्यांमध्ये डी. जी. कुरेवाड, सचिन बागुल, ज्योती खरजुले, गणेश मिसाळ, कैलास घारे यांच्यासह इतरांचा समावेश आहे. जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी त्रिसदस्यीय समिती नेमून अंबड आणि घनसावंगीतील ७५-८० गावांच्या यादींची फेरतपासणी केली. यात ७४ कर्मचारी दोषी आढळले असून, आणखी १०-१५ जणांवर निलंबनाची टांगती तलवार आहे.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांना संरक्षण?**

लोणीकर यांनी उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदारांचा थेट सहभाग असल्याचा गंभीर आरोप केला आहे. कनिष्ठ कर्मचाऱ्यांवर कारवाई करून वरिष्ठांना पाठीशी घालणे हा शेतकऱ्यांवर अन्याय आहे, असे त्यांनी ठणकावले. सध्या ५ तहसीलदार आणि ५ नायब तहसीलदारांना नोटिसा देण्यात आल्या आहेत, परंतु ठोस कारवाई बाकी आहे. माजी मंत्री, आमदार बबनराव लोणीकर यांनी यासंदर्भात मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि कृषिमंत्र्यांकडे तक्रार करण्याची घोषणा केली आहे.

**वसुली आणि शेतकऱ्यांचे अनुदान**

जिल्हा प्रशासनाने आतापर्यंत ५ कोटी ७४ लाख रुपये वसूल केले असून, उर्वरित रक्कम वसुलीसाठी दोषींची मालमत्ता जप्त करण्याची मागणी लोणीकर यांनी लावून धरली आहे. एकूण २ लाख ५७ हजार २९७ शेतकऱ्यांपैकी १ लाख ९४ हजार ११३ जणांना अनुदान मिळाले, तर ६३ हजार १८४ शेतकऱ्यांचे अनुदान आणि १५ हजार ३१ जणांचे ई-केवायसी प्रलंबित आहे. निधीअभावी आणि ई-केवायसीच्या अडचणींमुळे शेतकऱ्यांचे अनुदान थांबले असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनी सांगितले.

### ३८ ग्रामसेवक व २० कृषी सहाय्यकांवर होणार कारवाई

अनुदान वाटपात घोटाळा केल्या प्रकरणी दोषी आढळून आलेल्या तलाठी आणि महसूल खात्यातील अन्य कर्मचाऱ्यांवर जिल्हा प्रशासनाने निलंबनाची कारवाई केली आहे.आता या घोटाळ्यात सहभाग असल्याचे चौकशीत निष्पन्न झाल्याने जिल्ह्यातील विशेषतः अंबड ,घनसावंगी तालुक्यातील ३८ ग्रामपंचायत अधिकारी आणि २० कृषी सहाय्यकांवर देखील निलंबनाची कारवाई प्रस्तावित करण्यात आल्याचे सरकारी सूत्रांनी सांगितले. जिल्हा प्रशासनाने याबाबतचा प्रस्ताव जालना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्या कार्यालयाकडे पाठविण्यात आला असल्याचे या सूत्रांनी स्पष्ट केले आहे.

**आमदार बबनराव लोणीकरांचा निर्धार: शेतकऱ्यांना न्याय मिळणार!**

आमदार लोणीकर यांनी जालना जिल्ह्यातील सर्व आमदारांना एकत्रित करून विधानसभेत हा मुद्दा प्रखरपणे मांडण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. शेतकऱ्यांचा एक-एक पैसा परत मिळवू. भ्रष्टाचार्यांना तुरुंगात टाकू आणि त्यांची मालमत्ता जप्त करू. सरकारने तात्काळ एसआयटी चौकशीचे आदेश द्यावेत, अन्यथा आम्ही रस्त्यावर उतरू! असा इशारा त्यांनी दिला आहे.

**चौकशीचा विस्तार**

लोणीकर यांच्या पाठपुराव्यामुळे मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये गेल्या ५ वर्षांतील अनुदान वाटपाची चौकशी करण्याचे आदेश विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी दिले आहेत. यामुळे इतर जिल्ह्यांतील संभाव्य गैरप्रकारही उघड होण्याची शक्यता आहे.

**शेतकऱ्यांचा आवाज, आमदार लोणीकरांचा लढा**

हा घोटाळा शेतकऱ्यांच्या हक्कावर डल्ला मारणारा आणि प्रशासनाच्या भ्रष्ट कारभाराचा कळस आहे. आमदार बबनराव लोणीकर यांनी आपल्या निष्ठेने आणि आक्रमक पाठपुराव्याने शेतकऱ्यांचा आवाज बुलंद केला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली हा लढा यशस्वी होईल आणि दोषींना कठोर शिक्षा होऊन शेतकऱ्यांना त्यांचा हक्क मिळेल, असा विश्वास शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे. जालना जिल्ह्यातील शेतकरी हा घोटाळा सहन करणार नाही. प्रत्येक भ्रष्ट अधिकाऱ्याला उघडा करू आणि शेतकऱ्यांचा पैसा परत मिळवू. राज्य सरकारने तात्काळ एसआयटी चौकशीचे आदेश द्यावेत, अन्यथा रस्त्यावर उतरू! असा इशारा सत्ताधारी महायुती भाजपाचे परतुर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांनी दिला आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.